कृषीवल

रायगड ॥ बुधवार, दिनांक २२ जून २०२२

# इंदिरा गांधी राष्ट्रीय विद्यापीठात प्रवेश सुरु

**। पनवेल । वार्ताहर ।**

इग्नुच्या मास्टर, बॅचलर, पी जी डिप्लोमा, डिप्लोमा आणि सर्टिफिकेट प्रोग्रामसाठी जुलै २०२२ मध्ये नवीन प्रवेश सुरू झाले आहेत. आणि प्रवेशाची अंतिम तारीख ३१ जुलै २०२२ आहे.

इग्नु उच्च शिक्षणात २४० हून अधिक प्रोग्राम ऑफर करत आहे. डॉ. ई. कृष्णा राव, इग्नू क्षेत्रीय केंद्र मुंबईचे क्षेत्रीय निदेशक यांनी माहिती दिली की, मुंबई विभागात सर्व प्रोग्राम करीता प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू झाली आहे. मागील सेमिस्टर/वर्षात आधीच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील सेमिस्टर/वर्षासाठी री-रजिस्ट्रेशन प्रक्रिया देखील सुरु झाली आहे. री-रजिस्ट्रेशनची अंतिम तारीख ३0 जून २०२२ आहे. तपशीलवार माहितीसाठी, विद्यार्थी www.ignou.ac.in संकेतस्थळाला भेट देऊ शकतात.

www.newsband.in • VOL. 16 • ISSUE: 45 • WEDNESDAY, 22 JUNE 2022

Just Honest Journalism

Newsband

• RNI No. MAHENG/2007/21778 • POSTAL REGN. NO. NMB/154/2020-22/VASHI MDG POST OFFICE ■ PAGES: 8 ■ PRICE : ₹2.00

# IGNOU: Fresh admission/ Re-registraion open for July 2022

**By Chandrashekhar Hendve**

Fresh admission for July 2022 has started for Master, Bachelor, PG Diploma, Diploma and certificate programmes of IGNOU and the last date of admission is 31st July 2022. IGNOU is offering more than 240 programmes in higher studies.

Dr. E. Krishna Rao, Regional Director (I/c) of IGNOU Regional Centre Mumbai gave information that all programmes are activated at Mumbai region and the admission is going on through online mode. The Re-registration for next semester/year is also started for the students who already took admission in last semester / year. The last date of re-registration is 30th June 2022. For detailed information, students can visit www.ignou.ac.in

He further introduced about the extension centres of IGNOU-MSDE which will be open in Government ITIs and Jan Shikshan Sansthan and Pradhan Mantri Kaushal Vikas Kendra. IGNOU is providing the skilled based and vocational programmes for ITI students through these extension centres. IGNOU is providing the fee exemption facility for SC/ST students. Total 55 programmes are coming under this facility. Total 55 bachelors, Diploma and Certificates are offered free to SC/ ST students.

Further, the AICTE has granted approval to IGNOU for admission of 1 lakh seats in Master of Business Administration(MBA) programme, including in Specializations (90 thousand in ODL mode and 10 thousand in online mode) and 30000 seats in Master of Computer Applications(MCA) programme (20 thousand in ODL mode and 10 thousand in online mode) for the year 2022-23.

IGNOU is offering many programmes having more demands in the job market and industry.

अधिक बातम्यांसाठी आमच्या
वेबसाईटला भेट द्या
www.naveshahar.com
नवे शहर

आपलं
# नवे शहर
नवी मुंबईतील विश्वासार्ह दैनिक ₹२

SAINANAK ONLINE
Learn Music
On-line
@ ₹ 500/-* class
One-to-one 30min.
+91 9224253500

वर्ष : २१ अंक : ४३ पाने : ४, रविवार, १९ जून २०२२ ठाणे RNI No.61792/94 Post.Reg.:NMB/136/2022-2024/Vashi MDG P.O.

# इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ तर्फे विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरु

**पनवेल** : इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नु) यांच्या मास्टर, बॅचलर, पी.जी. डिप्लोमा, डिप्लोमा आणि सर्टिफिकेट अभ्यासक्रमासाठी जुलै पासून नवीन प्रवेश सुरु होणार आहेत. या प्रवेशाची अंतिम तारीख ३१ जुलै २०२२ अशी आहे. इग्नु उच्च शिक्षणात २४० हून अधिक प्रोग्राम ऑफर करत आहे.

मुंबई विभागात सर्व प्रोग्रामकरिता प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पध्दतीने सुरु झाली आहे. मागील सेमिस्टर/वर्षात आधीच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील सेमिस्टर/वर्षासाठी री-रजिस्ट्रेशन प्रक्रिया देखील सुरु झाली आहे. री-रजिस्ट्रेशनची अंतिम तारीख ३० जून २०२२ आहे. तपशीलवार माहितीसाठी, विद्यार्थी www.ignou.ac.in संकेतस्थळाला भेट देऊ शकतात. इग्नू-एम.एस.डी.ई.चे विस्तार केंद्र सरकारी आयटीआय आणि जनशिक्षण संस्था आणि प्रधानमंत्री कौशल विकास केंद्रामध्ये सुरु होतील. इग्नू या विस्तार केंद्रांद्वारे आयटीआय विद्यार्थ्यांसाठी कुशल आधारित आणि व्यावसायिक प्रोग्राम उपलब्ध होणार आहेत, अशी माहिती इग्नू क्षेत्रीय केंद्र मुंबईचे क्षेत्रीय निदेशक डॉ. ई. कृष्णा राव यांनी दिली.

इग्नू तर्फे एससी, एसटी विद्यार्थ्यांसाठी फी सवलत सुविधा देण्यात येणार आहे. या सुविधेअंतर्गत एससी, एसटी विद्यार्थ्यांना एकूण ५५ प्रकारचे बॅचलर, डिप्लोमा आणि सर्टिफिकेट शिक्षणाची संधी मोफत उपलब्ध आहेत. AICTE ने इग्नुला मास्टर ऑफ बिझनेस ऍडमिनिस्ट्रेशन (MBA) प्रोग्राममध्ये १ लाख जागांसाठी मान्यता दिली आहे, ज्यात स्पेशलायझेशन ऑनलाईन डिस्टन्स लर्निंग मोडमध्ये ९० हजार आणि ऑनलाइन मोडमध्ये १० हजार आणि मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स मध्ये ३० हजार जागा समाविष्ट आहेत. सन २०२२-२३ वर्षासाठी ही प्रोग्राम (ऑनलाईन डिस्टन्स लर्निंग मोडमध्ये २० हजार आणि ऑनलाइन मोडमध्ये १० हजार) समाविष्ट आहेत. एकंदरीतच इग्नूतर्फे नोकरीच्या बाजारपेठेत आणि उद्योगात अधिक मागणी असलेले अनेक प्रोग्राम उपलब्ध केले आहेत.

»Marathi »Solapur »Volum 3 »Issue 106» Wednesday 1 JUNE 2022 »Page 4 »Price 5 Rupee

हिंदवी बाण्याचे मराठी दैनिक

शिव निर्णय

DAILY SHIV NIRNAY

RNI No.-MAHMAR/2020/79125

रायगड , पुणे, सातारा, सोलापूर येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# जन शिक्षण संस्थान रायगड सहाण येथे इग्नु सेंटरची सुरुवात ; लाभार्थ्यांना मोफत पदवी शिक्षण

**शिव निर्णय** /अलिबाग : कौशल्य विकास व उद्योजगता मंत्रालय भारत सरकार व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नु) यांच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यामध्ये कार्यरत असणारी भारत सरकारची योजना जन शिक्षण संस्थान रायगड सहाण अलिबाग येथे इग्नु रेजिस्ट्रेशन सेंटर ची सुरुवात करण्यात आली आहे. सदर सेंटरच्या माध्यमातून एससी, एसटी लाभार्थ्यांना मोफत पदवी व ऊच्च पदवी शिक्षण मोफत मिळणार असून समाजातील सर्व स्तरातील लाभार्थ्यांना अतिशय अल्प दरामध्ये पदवी व ऊच्च पदवी शिक्षण घेण्याची सुवर्ण संधी उपलब्ध होणार आहे.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, संचालक श्री विजय हिरामण कोकणे व व्यवस्थापक मंडळ यांच्या मार्गदर्शनातून भारत सरकारच्या कौशल्य विकास योजने अंतर्गत कार्यक्रम राबवित असतांना सदर प्रेरणादायी उपक्रम ग्रामीण भागातील लाभर्त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचविण्याच्या दृष्टिकोनातून सदर उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यात इग्नु मुंबईचे रिजनल डायरेक्टर डॉ. क्रिष्णा राव इस्थरला जी यांचे विशेष सहकार्य लाभले.

सदर रेजिस्ट्रेशन सेंटरच्या माध्यमातून रायगडवासियांना पदवी व ऊच्च पदवी शिक्षण घेण्यासाठी सदर सेंटरच्या माध्यमातून रेजिस्ट्रेशन फॉर्म ऑनलाइन भरण्याची सुविधा प्राप्त होणार आहे. सदर पदवी व ऊच्च पदवी शिक्षणासाठी ऑनलाइन पुस्तके उपलब्ध होणार असून हि पुस्तके व शिक्षणव्यवस्था इंग्रजी व हिंदी माध्यमातून उपलब्ध असणार असून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लेक्चर्स अटेंड करायचे नाहीत निवडलेल्या विषयाचा स्वतःच अभ्यास करायचा आहे व दिलेले असाइन्मेंट प्रत्यक्ष अथवा ऑनलाइन मुख्य कार्यालयात जमा करायचे आहेत. वार्षिक परीक्षा लेखी स्वरूपात पिल्लई कॉलेज पनवेल या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून द्यायची आहे सदर सेंटरच्या माध्यमातून , लाभार्थ्यांना मोफत पदवी व ऊच्च पदवी शिक्षण मोफत मिळणार असून समाजातील सर्व स्तरातील लाभार्थ्यांना अतिशय अल्प दरामध्ये पदवी व ऊच्च पदवी शिक्षण घेण्याची सुवर्ण संधी उपलब्ध होणार आहे. सदर रेजिस्ट्रेशन सेंटरच्या माध्यमातून ११ विविध पदवी अभ्यासक्रम, ९ विविध पदवी डिप्लोमा अभ्यासक्रम एससी, एसटी २७ विविध ऊच्च पदवी अभ्यासक्रम, २७ विविध ऊच्च पदवी डिप्लोमा अभ्यासक्रम, १८ विविध सर्टिफिकेट अभ्यासक्रम यांचे लाभार्थ्यांना सदर सेण्टरच्या माध्यमातून रेजिस्ट्रेशन करता येणार आहे.

सदर सर्व ऍडमिशन जुलै २०२२ पासून सुरु होणार आहेत.

अधिक माहिती साठी संपर्क साधा श्री विजय हिरामण कोकणे संचालक जन शिक्षण संस्थान रायगड ९९२२९९२९७१, ९८१९८५४३०८

रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक ३५४ ॥ पृष्ठे ८

कृषीवल

रायगड ॥ बुधवार, दिनांक १ जून २०२२

किंमत ४ ₹

# सहाण येथे इग्नु सेंटरची सुरुवात

## एससी, एसटी लाभार्थ्यांना मोफत पदवी शिक्षण

। अलिबाग । वार्ताहर ।

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नु) यांच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यामध्ये कार्यरत असणारी भारत सरकारची योजना जन शिक्षण संस्थान रायगड सहाण अलिबाग येथे इग्नु रजिस्ट्रेशन सेंटरची सुरुवात करण्यात आली आहे.

सदर सेंटरच्या माध्यमातून एससी, एसटी लाभार्थ्यांना मोफत पदवी व उच्च पदवी शिक्षण मोफत मिळणार असून समाजातील सर्व स्तरातील लाभार्थ्यांना अतिशय अल्प दरामध्ये पदवी व उच्च पदवी शिक्षण घेण्याची सुवर्ण संधी उपलब्ध होणार आहे. संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया,



अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, संचालक विजय हिरामण कोकणे व व्यवस्थापक मंडळ यांच्या मार्गदर्शनातून भारत सरकारच्या कौशल्य विकास योजने अंतर्गत कार्यक्रम राबवित असताना सदर प्रेरणादायी उपक्रम ग्रामीण भागातील लाभार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचविण्याच्या दृष्टिकोनातून सदर उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यात इग्नु मुंबईचे रिजनल डायरेक्टर डॉ. कृष्णा राव इस्थरला यांचे विशेष सहकार्य लाभले.

सदर रजिस्ट्रेशन सेंटरच्या माध्यमातून ११ विविध पदवी अभ्यासक्रम, ९ विविध पदवी डिप्लोमा अभ्यासक्रम, २७ विविध उच्च पदवी अभ्यासक्रम, २७ विविध उच्च पदवी डिप्लोमा अभ्यासक्रम, १८ विविध सर्टिफिकेट अभ्यासक्रम यांचे लाभार्थ्यांना सदर सेंटरच्या माध्यमातून रजिस्ट्रेशन करता येणार आहे. सदर सर्व ॲडमिशन जुलै २०२२ पासून सुरु होणार आहेत.

सोबत **स्मार्ट** पुरवणी

# पुण्य नगरी

गुरुवार, २३ जून २०२२

वर्ष :२३ | अंक : ०८० | पाने : १०+४=१४ | किंमत : ५.००


## योग दिनानिमित्त व्यायामाचे प्रशिक्षण

**नवीन पनवेल :** इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ प्रादेशिक केंद्र, मुंबई पनवेल येथे ८ वा आंतरराष्ट्रीय योगदिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थितांना विविध प्रकारची योगासने, प्राणायाम, श्वसनासंबंधी सूक्ष्म व्यायाम प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. ई. कृष्णा राव इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ प्रादेशिक केंद्र मुंबईचे क्षेत्रीय निदेशक, त्यास बरोबर राम पलत यादव पतंजली योग समितीचे योग तज्ञ व त्यांचे सहायक रश्मी रंमगारीया उपस्थित होते. डॉ. ई. कृष्णा राव यांनी राम पलत यादव व रश्मी रंमगारीया आणि आलेल्या पाहुण्यांचे पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत केले.

# लोकदृष्टी

## दैनिक लोकदृष्टी

# पनवेल येथे इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ प्रादेशिक केंद्रातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिवस संपन्न

पनवेल (वार्ताहर) - इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ प्रादेशिक केंद्र मुंबई पनवेल येथे ८ वा आंतरराष्ट्रीय योगदिवस साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमात डॉ. ई.कृष्णा राव इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ प्रादेशिक केंद्र मुंबईचे क्षेत्रीय निदेशक, त्यास बरोबर राम पलत यादव पतंजली योग समिती चे योग तज्ञ व त्यांचे सहायक, रश्मी रंमगारीया, संगम योग क्लासेस चे व्यवस्थापक, मयूर तांबडे व संजय कदम उपस्थित होते. डॉ. ई.कृष्णा राव यांनी राम पलत यादव व रश्मी रंमगारीया आणि आलेल्या पाहुण्यांचे पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत केले. राम पलत यादव आणि उपस्थिताना विविध प्रकारचे योग् आसने, प्राणायाम तसेच सूक्ष्म व्यायामचे प्रशिक्षण दिले. त्या सोबतच योग् आणि व्यायामाचे मानवी जीवनातील महत्व अधोरेखित केले. रश्मी रंमगारीया यांनी उपस्थितांना श्वसनासंबंधी सूक्ष्म व्यायाम प्रकारचे प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रमाचे क्षेत्रीय केंद्र मुंबई च्या अधिकृत चॅनेलद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात आले. डॉ. ई.कृष्णा राव यांनी मान्यवराचे व इग्नु कर्मचारी यांचे आभार मानले, त्यानंतर राष्टगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कृषीवल
रायगड ॥ गुरुवार, दिनांक २३ जून २०२२

# इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ योग

। पनवेल । वार्ताहर ।

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ प्रादेशिक केंद्र मुंबई पनवेल येथे ८ वा आंतरराष्ट्रीय योगदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात डॉ.ई.कृष्णा राव, राम पलत यादव रश्मी रंमगारीया, मयूर तांबडे, संजय कदम उपस्थित होते. राम पलत यादव आणि उपस्थितांना विविध प्रकारचे योग आसने, प्राणायाम तसेच सूक्ष्म व्यायामाचे प्रशिक्षण दिले. त्यासोबतच योग आणि व्यायामाचे मानवी जीवनातील महत्व अधोरेखित केले.

मुंबई । गुरुवार
२३.६.२०२२
www.lokmat.com
epaper.lokmat.com
महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत

# इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठात योग दिन

**नवीन पनवेल :** इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ प्रादेशिक केंद्र मुंबई पनवेल येथे ८वा आंतर्राष्टीय योगदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. ई.कृष्णा राव इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ प्रादेशिक केंद्र मुंबईचे क्षेत्रीय निदेशक, त्याचबरोबर राम पलत यादव पतंजली योग समितीचे योगतज्ज्ञ व त्यांचे सहायक रश्मी रंमगारीया, संगम योग क्लासेसचे व्यवस्थापक, कर्मचारी उपस्थित होते.